-: प्रेसनोट दिनांक- १६/११/२०२१ :-

बबन कृष्णाजी खोत, वय ५७, शाखा अभियंता, नगररचना विभाग, इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, रा. ८/१३०५, नारायण मळा, इचलकरंजी व किरणकुमार विलास कोकाटे, वय ४६, खाजगी इसम, रा. १३/८१०, संत मळा, इचलकरंजी यांनी लाचेची मागणी करून ती लाच रक्कम स्विकारलेबाबत.........

---

(तकारदार यांचे नाव किंवा त्यांची ओळख पटेल असा कोणताही मजकूर नमुद करणेत येवु नये ही विनंती आहे.)

यातील तकारदार खरेदी करणार असले जमिनीचे गुंठेवारी पोटविभागनीची फाईलचे काम इचलकरंजी नगरपरिषद येथे मुख्याधिकारी यांचेकडे प्रलंबित आहे. त्याबाबत इचलकरंजी नगरपरिषद येथील खाजगी इमस कोकाटे हा मुख्याधिकारी यांची सही घेवुन काम करून देण्यासाठी प्रथम २५,०००/- रू. ची मागणी करून तडजोडीअंती २०,०००/- रू. लाचेची मागणी करत असलेबाबत तकार प्राप्त झाली होती.

तकारदार यांचे तकारीप्रमाणे सापळा कारवाई आयोजित केली असता, दिनांक १२/११/२०२१ रोजी इचलकरंजी नगरपरिषद कार्यालयात शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष तकारदार यांचेकडे खाजगी इसम किरणकुमार कोकाटे व शाखा अभियंता बबन खोत यांनी त्यांचे जमिनीचे गुंठेवारी पोटविभागणीचे कामाचे फाईलवर मुख्याधिकारी यांची सही घेवुन काम पुर्ण करून देण्यासाठी म्हणुन तडजोडीअंती २०,०००/- रू. लाचेची मागणी करून ती लाच रक्कम आज दि. १६/११/२०२१ रोजी शाखा अभियंता बबन खोत यांचेसमोरच खाजगी इसम कोकाटे यांनी स्विकारल्याने त्या दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे. सदरबाबत आरोपी लोकसेवक बबन कृष्णाजी खोत, वय ५७, शाखा अभियंता, नगररचना विभाग, इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, रा. ८/१३०५, नारायण मळा, इचलकरंजी व खाजगी इसम किरणकुमार विलास कोकाटे, वय ४६, रा. १३/८१०, संत मळा, इचलकरंजी यांचेविरूध्द शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रकिया सुरु आहे.

सदरची कारवाई मा.श्री.राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मा. श्री.सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व मा.श्री. सुहास नाडगौंडा, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, पोहेकॉ शरद पोरे, पोना विकास माने व सुनिल घोसाळकर, पोकॉ मयुर देसाई व रूपेश माने, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.

५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.

Scanned by TapScanner